महाराष्ट्र टाइम्स



# डम्पिंग प्रदूषण मुंबईभर



म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

मुंबईतील देवनार डम्पिंग ग्राऊंडमधील प्रदूषणाचा त्रास फक्त त्याच भागातील रहिवाशांपुरता मर्यादित राहिलेला नसून, वाऱ्याबरोबर प्रदूषित वायू संपूर्ण मुंबईभर पसरत आहे. मुंबईतील वाढत्या धूळ-प्रदूषणामुळे लहान मुलांमधील आजारही वाढत आहेत. वारंवार होणारी सर्दी, संसर्गजन्य ताप, दमा अशी लक्षणे लहान वयातच मुलांमध्ये दिसू लागली असून, मुंबईत सरासरी २५ टक्के लहान मुलांमध्ये प्रदूषणाशी संबंधित आजार आढळून येत आहेत.

मुंबईतील देवनार डम्पिंग ग्राऊंडमुळे प्रदूषणाचा मुद्दा ऐरणीवर आला. या प्रदूषणामुळे चेंबूर, गोवंडी, मानखुर्दमधील रहिवाशांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे. सातत्याने लागणाऱ्या आगी, त्यातून निर्माण होणारे धुराचे लोट, दुर्गंधी, कचऱ्यातून निर्माण होणारे विषारी वायू यांमुळे आसपासच्या नागरिकांचे जगणे कठीण झाले असतानाच, आगीचा धूर व प्रदूषित वायू वाऱ्याबरोबर मुंबईच्या इतर भागातही पसरत असून, त्यामुळे बहुतेक मुंबईकरांना त्रास सोसावा लागत आहे. मुंबईत गेल्या काही वर्षात प्रदूषणात वाढ झाली असून, वेगवेगळ्या कारणांमुळे धुलीकणांचे प्रमाणही वाढत आहे.

**लहान मुलांमधील आजार वाढले**

देवनारसह मुंबईतील इतरही डम्पिंग ग्राऊंडच्या प्रद्रूषणामुळे फुफ्फुसांचेच आजार होत नसून, संपूर्ण शरीरावरच त्याचा परिणाम दिसून येत आहे. शरीरात ऑक्सिजनबरोबर प्रदूषित कणही प्रवेश करतात आणि हृदयापासून बुहुतेक सर्व अवयवांवर त्याचा परिणाम होतो. कार्बन मोनॉक्साइडचा थेट परिणाम मेंदूवर होतो, असे नानावटी हॉस्पिटलचे छाती विकार तज्ज्ञ डॉ. सलील बेंद्रे सांगतात. प्रदूषणाचा मेंदूवर परिणाम झाला तर लक्ष केंद्रीत होत नाही. झोप येत नाही, चिडचिडेपणा, थकवा येणे, डोकेदुखी अशा तक्रारी वाढतात. त्याशिवाय अस्थमा, ॲलर्जी, डोळे चुरचुरणे असा आजारही दिसून येतात. धुळीचा व प्रदूषणाचा अप्रत्यक्ष परिणाम रक्तदाबावरही होतो. डोकेदुखी, चिडचिडेपणामुळे सतत राग येत राहिला, झोप कमी झाली तर त्याचा परिणाम रक्तदाबावर होतो याकडे डॉ. बेंद्रे यांनी लक्ष वेधले.

## धोकादायक मिथेन वायू

आयआयटीने दिलेल्या अहवालानुसार देवनार डम्पिंग ग्राउंडच्या कचऱ्याखाली अंदाजे १२७ लाख टन मिथेन वायू दबलेला आहे. या ज्वलनशील वायूमुळे माणसाचा गुदमरून मृत्यू होतो. मिथेन वायू हवेतील प्राणवायूची जागा घेतो. परिमामी हवेतील प्राणवायूचे प्रमाण कमी होते. मिथेन वायूमुळे प्राणवायूचे प्रमाण दहा टक्क्यांपेक्षा कमी झाले तर मृत्यू ओढवू शकतो, अशी माहिती पालिका हॉस्पिटलमधील एका डॉक्टरने नाव न सांगण्याच्या अटीवर दिली.

### लहानग्यांना त्रास

**धूळ व प्रदूषणामुळे लहानग्यांमध्ये हल्ली अनेकदा वारंवार सर्दी, संसर्गजन्य ताप व दम्याचे प्रमाण वाढल्याचे दिसून येते. साधारण १०० मुलांपैकी सरासरी २० ते २५ टक्के मुलांमध्ये प्रदूषणाशी निगडित आजार आढळून येतात. दम्याच्या वाढत्या प्रमाणामागे प्रदूषण हेच प्राथमिक कारण आहे. मुंबईच्या अनेक भागात प्रदूषणाशी निगडित आजार आढळून येत आहेत.**

**-डॉ. सलील बेंद्रे,**
पल्मनरी मेडिसीन विभागप्रमुख,
नानावटी हॉस्पिटल

